# प्रेस नोट

## गुन्ह्यातील जप्त मालमत्ता प्रदान केल्याबाबत.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती यांच्या संकल्पनेतुन आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-७ मधील सर्व ०८ पोलीस ठाण्याकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले तसेच गहाळ झालेले हस्तगत मुद्देमाल (फिर्यादी/तक्रारदार) यांना परत करण्याकरीता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

परिमंडळ-७ मधील घाटकोपर, पंतनगर, विक्रोळी, पार्कसाईट, भांडुप, कांजुरमार्ग, मुलुंड, नवघर पोलीस ठाण्याकडुन जबरी चोरी, घरफोडी, मोबाईल चोरी तसेच इतर चोरी व गहाळ झालेले १०८७ मोबाईल, २३ तोळे सोने, ०२ किलो चांदी व रोख रक्कम अशी एकुण रूपये १,९१,७७,०००/- (एक कोटी ऐक्यानव लाख सत्याहत्तर हजार रूपये) किंमतीची मालमत्ता पोलीसांनी तपासादरम्यान हस्तगत केली होती.

आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी मुलुंड येथे मा.डॉ. महेश पाटील, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर मुंबई यांच्या हस्ते वरील किंमतीची मालमत्ता संबधीत फिर्यादी/तक्रारदारांना परत करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये गुन्हयातील मालमत्ता पोलीसांकडुन परत मिळाल्याने फिर्यादी यांनी समाधान व्यक्त करून पोलीसांचे आभार मानले.

........